# अंत

घड्याळाच्या काट्याला लटकलेले,
वर्तमानाच्या भोवऱ्यात अडकलेले,
आपल्या नात्याचे क्षण -

सहवासाची गोडी, प्रेमाची साथ, माया अन काळजी
या व्याख्या आणि धडे पाठ असलेले
परंतु प्रात्यक्षिकाशिवाय रखडलेले क्षण -

निळ्याभोर आकाशातील ढगांची नक्षी,
पाखरांचा चिवचिवाट, फुललेल्या बागा
आणि यांच्या साक्षीने हातात हात घालून
फिरण्याच्या स्वप्नात तडपलेले क्षण -

घड्याळाला लटकलेल्या अवस्थेतच बहुदा
थांबेल आपल्या हृदयाची टिक टिक
आणि आपल्या नात्याचा अंत तर
त्या पूर्वीच कधीतरी झाला असेल,

फार पूर्वी ...

**- प्रीती देशपांडे**

**www.meetipreeti.com**